केलेल्या आंदोलनावेळी घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. संत सद्गुरु बाळूमामा यांचे मूळ क्षेत्र असलेल्या मेतके येथे चिकोत्रा नदीवरती सध्या असणारा कोल्हापूर पद्धतीचा बंधारा हा खूप धोकादायक आहे. मेतके

...तात ते याच अरुंद बंधाऱ्याव... चाकी व पायी जात असता... मार्गावर वर्दळ असते. पाव... इतर वेळी या बंधाऱ्याला... नसल्याने व रुंदी ही अत्यंत क... दोन वाहने यावरून पास...



# देवचंद महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची ऑफिसरपदी निवड

निपाणी, ता. ६ (प्रतिनिधी) -

देवचंद महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारांतर्गत संगणकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हील फाउंडेशन, पुणेतर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. क्लब ऑफिसर म्हणून निवड झालेले ४ विद्यार्थी व १६ सायबर वॉरियर्स असे एकूण २० विद्यार्थी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

संगणकशास्त्र विभागातील अथर्व माने (प्रेसिडेंट), श्रावणी पवार (सेक्रेटरी), आलोक कांबळे (मीडिया डायरेक्टर), रुद्र सुतार (कम्युनिटी डायरेक्टर) आणि प्रा. प्रशांत कुंभार यांची या उपक्रमासाठी समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरीएंटेशन विमाननगर (पुणे) येथील कंपनीच्या ऑफिसमध्ये पार पडले. ट्रेनिंगसेशन दरम्यान श्री. अजय शिर्के, गायत्री केसकर-पवार आणि दिपू सिंग यांनी मार्गदर्शन केले. कंपनीच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्या. या उपक्रमास जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, आणि उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. डॉ. जी. डी. इंगळे व उपप्राचार्य डॉ. आर. के. दिवाकर यांचे मार्गदर्शन मिळाले.



निपाणी: आषाढी दिंडी सोहळ्यात सहभागी झालेले विद्यार्थी

## बागेवाडी महा...